# जिल्हाधिकारी कार्यालय परभणी

जाक्र२०१६/अ-२/आस्था-१/जिआव्यअ/सिआर-३६ दिनांक १३/०६/२०१६

महाराष्ट्र शासन महसुल व वन विभाग (मदत व पुनर्वसन) शासन निर्णय क्रमांक आव्यप्र - २०१६ /प्रक्र ७२ / अव्याप्र - १ मंत्रालय मुंबई दिनांक ०७.०५.२०१६ अन्वये महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमासाठी निर्माण केलेल्या जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या ४० पदांना मुदतवाढ देण्यास आणि एकुण ४० पदांना ३१.०३.२०१७ पावेतो दरमहा प्रत्येकी ३०,०००/- (रुपये तीस हजार फक्त) एवढे ठोक मानधन अदा करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे.

उक्त मान्यतेनुसार महाराष्ट्र राज्य आपत्ती व्यवस्थापन कार्यक्रमासाठी निर्माण केलेले कंत्राटी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी हे पद दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत कंत्राट पध्दतीने भरण्याकरीता इच्छुक उमेदवारांकडुन दिनांक २८/०६/२०१६ रोजी पर्यंत अर्ज मागविण्यात येत आहे. अर्जाचा नमुना भरण्याकरीता parbhani.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

**पदाचा संपुर्ण तपशिल पुढील प्रमाणे आहे.**

| | | |
|---|---|---|
| १ | पदाचे नाव | जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी (कंत्राटी) |
| २ | पदांची संख्या | ०१ (एक) |
| ३ | ठोक वेतन | प्रती महिना ३०,०००/- (तीस हजार रुपये) (या व्यतिरिक्त कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत) |
| ४ | शैक्षणिक अर्हता | मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी / पदव्युत्तर पदवी (सामाजिक शास्त्रे किंवा आपत्ती व्यवस्थापन ) |
| ५ | अनुभव | १. आपत्ती व्यवस्थापनातील कामाचा अनुभव असलेल्या उमेदवारांना प्राधान्य देण्यात येईल.<br>२. मराठी व इंग्रजी भाषेचे चांगले ज्ञान असणे आवश्यक<br>३. टिपणी लेखन, अहवाल लेखन यामध्ये विशेष प्राविण्य. |
| ६ | कंत्राट कालावधी | नियुक्ती पासुन दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंत |

**विशेष सुचना**

१. पुर्णपणे तात्पुरत्या स्वरुपात व कंत्राटी पध्दतीने जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी या पदाची भरती होईल. या नेमणुकीमुळे उमेदवारांचा शासनाकडे कोणताही हक्क निर्माण होणार नाही.

२. उमेदवारांनी विहित नमुन्यातील अर्ज parbhani.nic.in या संकेतस्थळावरुन उपलब्ध करुन घ्यावा व अर्जाच्या पाकीटावर ठळक अक्षरात पदाचा उल्लेख करावा.

३. उमेदवारांनी आपला सोबतच्या नमुण्यातील अर्ज A – 4 साईजच्या पांढ-या कागदावर टंकलिखीत / हस्तलिखीत करुन मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा निवड समीती जिल्हाधिकारी कार्यालय, स्टेशन रोड, परभणी या पत्यावर दिनांक २८/०६/२०१६ पर्यंत सायंकाळी ०५.३० वाजपर्यंत पोहचतील अशारीतीने समक्ष अथवा टपाल पाठवावेत (सुटीचे दिवस वगळुन).

४. जाहिरातीपुर्वी व जाहिरातीमध्ये दिलेल्या मुदतीनंतर प्राप्त तसेच अपुर्ण, अर्धवटरित्या भरलेले, चुकीचे भरलेले अर्ज वा काही त्रुटी आढळुन आल्यास सदर अर्जांचा विचार केला जाणार नाही व त्याबाबत कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही.

५. टपालाने विलंबाने प्राप्त अर्ज (लिफाफे) उघडण्यात येणार नाहीत.

६. अर्ज केला अथवा विहित अर्हता धारण केली म्हणजे मुलाखतीचा अथवा नियुक्तीचा हक्क प्राप्त झाला असे नाही.

७. पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाचे नोटीस बोर्डावर लावण्यात येईल. त्याच प्रमाणे या कर्यालयाचे वेबसाईट parbhani.nic.in वर ठेवण्यात येईल. पात्र उमेदवारांची मुलाखतीचा दिनांक उमेदवारांना वरील संकेतस्थळावरुन कळविण्यात येईल या बाबत वेगळा पत्रव्यवहार केला जाणार नाही. तसेच अर्ज मोठया प्रमाणावर आल्यास चाळणी परिक्षा घेण्यात येईल व त्याबाबतचा तपशिल देखील वरील संकेतस्थळावर देण्यात येईल.

८. एक अथवा सर्व अर्ज नाकारण्याचा, निवड प्रकियेत वेळेवर होणारा बदल तसेच अंतीम निर्णय इत्यादीबाबतचे संपुर्ण अधिकार जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष निवड समिती यांनी राखुन ठेवला आहे.

पात्रतेच्या अटी व शर्ती

१. इच्छुक उमेदवारांनी भरती प्रक्रियेसाठी जाहीराती मध्ये दिनांक व वेळेनुसार उपस्थित रहावे. पोस्टामार्फत पत्र पाठविण्यात येणार नाही. भरती प्रक्रियेसाठी पात्र उमेदवारांची यादी जिल्हाधिकारी कार्यालय परभणी यांच्या नोटीस बोर्डवर त्याच प्रमाने parbhani.nic.in या संकेतस्थळावर देखील प्रसिध्द करण्यात येईल.

२. निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवाराच्या बाबतीत कोणतेही प्रकारचा पत्र व्यवहार केला जाणार नाही.

३. उमेदवाराने त्याच्या उमेदवारीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचा दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविण्यात येईल.

४. निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्ती नंतर कोणत्याही क्षणी उमेदवारांने अर्जात व अर्जासोबत दिलेली माहिती अगर कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवुन ठेवल्याचे नंतर निदर्शनास आल्यास त्या उमेदवाराची उमेदवारी / नियुक्ती तात्काळ रद्दकरण्यात येईल.

५. अंतीम निवड झालेल्या उमेदवाराची निवड कोणत्याही स्तरावर रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हाधिकारी यांचे राहतील. तसेच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देणे जिल्हाधिकारी यांच्यावर बंधनकारक राहणार नाही.

६. अंतीम निवड झालेल्या उमेदवारास नियुक्ती देण्याचे झाल्यास जिल्हाधिकारी परभणी यांचे कार्यालयात नियुक्ती देण्यात येईल. उमेदवारास महाराष्ट्र आपत्ती धोके व्यवस्थापन कार्यक्रम अंतर्गत जिल्हयात राबविण्याचा जिल्हा, तालुका व गाव पातळीवरील आराखडे निर्मीती विविध

अधिका-यांचे प्रशिक्षण व उदबोधन तसेच वेगवेगळया स्तरावर जनजागृती करणे व या कार्यक्रमांतर्गत जिल्हाधिकारी यांनी दिलेले निर्देशानुसार काम करणे बंधन कारक राहील.

७. अंतिम निवड झालेल्या उमेदवाराने त्यांच्या नियुक्तीचा आदेश प्राप्त झाल्याच्या दिनांकापासुन ७ दिवसात पदावर हजर होणे अनिवार्य आहे. अन्यथा त्याची नियुक्ती आपोआप रद्द होईल व ते पुढील नियुक्तीस अपात्र ठरतील. तसेच निवड सुचितील प्रतिक्षा यादीनुसार पुढील पात्र उमेदवारास नियुक्ती दिली जाईल.

८. मुळ प्रमाणपत्राची खातरजमा केल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारास नियुक्तीच्या ठिकाणी रुजु करुन घेण्यात येईल.

९. उमेदवारास नियुक्ती दिल्यानंतर चारीत्र्य व पुर्व चारित्र्य पडताळणी अहवाल असमाधानकारक असल्यास नियुक्ती रद्द करण्यात येईल.

१०. निवड झालेल्या उमेदवारास रुपये १००/- (अक्षरी रुपये शंभर) च्या बॉन्ड पेपरवर करारणामा करुन दयावा लागेल. ही नियुक्ती पुर्णतः कंत्राटी पध्दतीवर असल्याने उमेदवाराचा शासकीय सेवेवर कोणताही हक्क राहणार नाही किंवा त्यांची सेवा कायम शासकीय अधिकारी म्हणुन गणली जाणार नाही.

११. उमेदवाराची निवड तोंडी मुलाखतीद्वारे व शैक्षणीक पात्रतेच्या अनुषंगाने करण्यात येईल. तथापी उमेदवारांची संख्या जास्त आल्यास लेखी परीक्षा घेवुन त्यातुन गुणवत्तेने उमेदवारांची निवड करुन त्यांनंतर मुलाखत घेण्यात येईल. हे ठरविण्याचे अधिकार सर्वस्वी जिल्हाधिकारी यांचे राहतील.

**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा निवड समिती, परभणी**

## जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी पदासाठी

## अर्जाचा नमुना

| येथे नजीकच्या काळातील पासपोर्ट फोटो लावावा |
| --- |

प्रति,

मा. जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,
जिल्हा निवड समिती, परभणी,

पदाचे नाव - जिल्हा आपत्ती व्यवस्थापन अधिकारी.
कंत्राटी पध्दतीने नियुक्ती पासुन दिनांक ३१.०३.२०१७ पर्यंतच्या कालावधीसाठी.

जाहिरात क्रमांक - जाक्र२०१६/अ-२/आस्था-१/जिआव्यअ/सिआर-३६ दिनांक १३/०६/२०१६.

१. संपुर्ण नाव (मराठीत) ------------------------------------------------------------

आडनाव स्वताचे नाव वडील / पतीचे नाव

२. पत्र व्यवहाराचा पत्ता ------------------------------------------------------------

३. दुरध्वनी व मोबाईल क्र ------------------------------------------------------------

४. लिंग - (पुरुष / स्त्री) ------------------------------------------------------------

५. अर्जदाराची जन्म तारीख (शालांत प्रमाणपत्रानुसार) ------------------------------------------------------------

६. दिनांक ३१/०५/२०१६ रोजी वय ------------------------------------------------------------

७. वैवाहिक स्थिती - (विवाहित / अविवाहित) ------------------------------------------------------------

८. महाराष्ट्राचा रहिवाशी आहे काय ? ------------------------------------------------------------

९. **शैक्षणिक अर्हता**

| अ.क्र. | मंडळ/विद्यापीठाचे नांव | परीक्षेचे नाव | उत्तीर्ण वर्ष | विषय | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | | | | | |
| २ | | | | | |
| ३ | | | | | |
| ४ | | | | | |
| ५ | | | | | |

१०. **पुर्वानुभव (शासकीय / खाजगी )ः-**

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावधी |
|---|---|---|
| | | |
| | | |

पुर्वानुभव असल्यास संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

१०-अ. **आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवः-**

| कार्यालयाचे नाव व पत्ता | धारण केलेले पदनाम | नोकरीचा कालावधी |
|---|---|---|
| | | |
| | | |

संबंधित कार्यालयाचे/संस्थेचे दाखला/प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.

११. **संगणक अर्हताः**------------------------------------------------------------------------

## लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापत्र

मी श्री / श्रीमती/ कुमारी ------------------------------------------------------------------ वय---------------- वर्ष ---------------------------------- राहणार याव्दारे पुढील प्रमाणे असे जाहिर करतो/ करते की, मी ---------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केला आहे. आज रोजी मला --------------------- (संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या --------------------- आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

१) २)

हयात असलेल्या मुलांची संख्या दोन पेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००५ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे या पदासाठी मी अपात्र होउ शकतो मला जाणीव आहे.

पात्रतेच्या अटी व शर्ती मला मान्य असून या अटी व शर्तीचा भंग केल्यास भरतीच्या कुठल्याही टप्प्यामध्ये माझी उमेदवारी रद्द होईल याची मला जाणीव आहे. अर्जात नमुद केलेली माहिती माझ्या माहिती प्रमाणे खरी आहे. या पदासाठी विहित केलेली शैक्षणिक अर्हता आणि अनुभव माझ्याकडे आहे. मी असे प्रमाणित करतो/करते की, वर दिलेली माहिती खोटी व चुकीची आढळून आल्यास खोटया माहितीच्या आधारे मिळालेली उमेदवारी किंवा निवड/नियुक्ती रद्द होण्यास बाध्य राहिल. त्याबद्दल माझी कोणतीही तक्रार राहणार नाही.

दिनांकः / /२०१६ **अर्जदाराचे नाव व सही**

ठिकाणः

खालील कागदपत्रांच्या साक्षांकित छायाप्रती जोडल्या आहेत (#) मध्ये अशी खुण करावी.

1. शाळा सोडल्याचा दाखला [ ]
2. शैक्षणिक अर्हता प्रमाणपत्र व गुणपत्रिका [ ]
3. संगणक परिक्षा उत्तीर्ण असल्याचे प्रमाणपत्र [ ]
4. पुर्वानुभवाचा दाखला / प्रमाणपत्र (किमान 3 वर्ष ) [ ]
5. आपत्ती व्यवस्थापनातील अनुभवाचा दाखला (किमान 2 वर्ष) [ ]

दिनांकः / /२०१६ **अर्जदाराचे नाव व सही**